नवी आशा, नवी दिशा

# ‘अर्बन फार्मिंग’ ही काळाची गरज

## भविष्यातील शेतीच्या शहरीकरणावर एक दृष्टिक्षेप





फलोत्पादन, मत्स्य व्यवसाय, रेशीम उद्योग, मध उद्योग यासारख्या कृषिपूरक व्यवसायांना प्रोत्साहन देऊन गावातीलच तरुणांना रोजगाराच्या संधी निर्माण करून देण्यासाठी प्रयत्न झाला. अर्थात हा प्रयत्न काही काळ म्हणजेच १९९० च्या दशकापर्यंत काही प्रमाणात यशस्वी झाला. परंतु तरीही शहरांच्या फुग्यात ग्रामीण समाजाची हवा वाढतच राहिली. यामध्ये फार काही फरक झाला नाही. या पार्श्वभूमीवर जगभरात ‘शहरी भागातील शेती’ची संकल्पना उदयास येऊ लागली. शहरांचा विस्तार होत असताना आणि तुलनेने ग्रामीण भागातील जमीनधारणा घटत असताना संरक्षित स्वरुपात, कमी क्षेत्रात आणि शहरी भागातील उपलब्ध साधनसामग्रीचा विचार करून, विशिष्ट प्रकारची पीक लागवड आता भारतातही अल्प प्रमाणात का होईना मूळ धरू लागली आहे. या संकल्पनेविषयी...

भारत हा कृषिप्रधान आणि खेड्यांचा देश. म्हणूनच महात्मा गांधी म्हणत असत की भारताचा आत्मा खेड्यात आहे. याचमुळे महात्मा गांधींनी गावाकडे- खेड्याकडे चला, असा नारा स्वातंत्र्यानंतर दिला. अर्थात स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशामध्ये फार मोठे बदल होत गेले. यांत्रिकीकरण, औद्योगिकीकरण आणि इतर विकासाच्या योजना राबविल्यामुळे गावाकडील तरुण शहराकडे आकर्षित होऊ लागला. मधल्या काळात म्हणजे १९६०-७० च्या दशकात पुन्हा धवलक्रांती म्हणजे दुग्ध व्यवसायामध्ये मोठी प्रगती झाली. या दोन्ही क्रांती ग्रामीण भागातील समाजाला एक उभारी देण्यासाठी महत्त्वाच्या ठरल्या. त्यानंतर फलोत्पादन, मत्स्य व्यवसाय, रेशीम उद्योग, मध उद्योग यासारख्या कृषिपूरक व्यवसायांना प्रोत्साहन देऊन गावातीलच तरुणांना रोजगाराच्या संधी निर्माण करून देण्यासाठी प्रयत्न झाला. अर्थात हा प्रयत्न काही काळ म्हणजेच १९९० च्या दशकापर्यंत काही प्रमाणात यशस्वी झाला. परंतु तरीही शहरांच्या फुग्यात ग्रामीण समाजाची हवा वाढतच राहिली. यामध्ये फार काही फरक झाला नाही. आज देशाबरोबरच महाराष्ट्रातील अनेक शहरांची लोकसंख्या फार मोठ्या प्रमाणात वाढली आहे. जगामध्ये १९६० मध्ये ६७ टक्के समाज खेड्यामध्ये राहात होता. आज मात्र फक्त ४४ टक्के समाज खेड्यामध्ये राहतोय. चीनसारख्या जास्त आणि एक क्रमांकाच्या लोकसंख्या असलेल्या देशात फक्त ३९ टक्के समाज खेड्यात राहतो. प्रगत देश जसे की अमेरिका (१७%), यू.के. (१६ टक्के), रशिया (२५%), ऑस्ट्रेलिया (१४%) या देशांमध्ये फारच कमी लोक खेड्यांत राहतात.

## महानगरांची लोकसंख्या वाढतेय...

अर्थात यापैकी चीन देश सोडला तर इतर देशांतील फारच कमी समाज शेतीवर अवलंबून आहे. आपल्या देशाचा विचार केला तर ६५ टक्के समाज खेड्यांमध्ये राहतो. पूर्वीची आकडेवारी पाहिली तर १९०१ मध्ये ८८ टक्के लोक खेड्यात राहात होते. त्याचे प्रमाण कमी होऊन २००१ मध्ये ७२ टक्क्यापर्यंत कमी झाले. म्हणजेच १०० वर्षांत १६ टक्के लोक शहराकडे वळले. परंतु मागील २० वर्षांची हीच आकडेवारी बघितली तर या दोन दशकांत ७ टक्के समाज शहरामध्ये आला म्हणजेच मागील दोन दशकांमध्ये शहरीकरण झपाट्याने वाढत आहे. या दशकामध्ये म्हणजेच २०२० ते २०३० या कालखंडामध्ये आणखी ६ टक्के समाज शहरामध्ये येणार आहे.
यू.एन.च्या रिपोर्टनुसार भारतामध्ये शहरीकरणाचा हा क्रम अशाच प्रकारे सुरू राहिल्यास २०५० मध्ये खेड्यापेक्षा शहरामध्ये राहणाऱ्या समाजाचे प्रमाण जास्त राहणार आहे. २०५० मध्ये लोकसंख्येच्या बाबतीत भारत देश जगात पहिल्या क्रमांकावर असेल. म्हणजेच १६५ कोटी लोकसंख्या असलेला देश चीनला दोन नंबरवर ठेवून पहिल्या क्रमांकावर जाईल. एकूण १६५ कोटी लोकसंख्येपैकी ८७ कोटी लोकसंख्या (५२.८%) शहरामध्ये असेल तर ७८ कोटी लोकसंख्या (४७.२%) खेड्यामध्ये असेल. ग्रामीण समाजाचा वाढीचा वेग १.०६ टक्के तर शहरी समाजाचा हाच वेग १.५४ टक्के असेल. मागील ५० वर्षांत दिल्ली शहर २६ पटीत वाढून त्यांची लोकसंख्या २.८ कोटीपर्यंत गेली. मुंबई शहर ६ पट वाढून त्याची लोकसंख्या २.२ कोटी झाली. बेंगलोरसारखे शहर १० पटीने वाढून त्याची लोकसंख्या एक कोटी झाली. भविष्यात या महानगरांप्रमाणेच इतरही शहरांची लोकसंख्या अनेक पटीने वाढणार आहे. गावामध्ये कमी शिकलेले, कमी कार्यकौशल्य असलेले, अल्पभूधारक असलेले शेतकरी तसेच वयोवृद्ध समाज



जास्त प्रमाणात राहील. आज आपण कोकणचे उदाहरण घेऊ शकतो. कोकणातला समाज मोठ्या प्रमाणात मुंबईला गेल्यामुळे मोठ्या प्रमाणात शेती व्यवसाय हा व्यापारी- मोठा शेतकरी यांच्याकडे आला आहे. भविष्यात अशा प्रकारची परिस्थिती महाराष्ट्रासह देशातील इतर विभागांमध्ये होऊ शकते. यासाठीच शहरी कृषी व्यवसायाची म्हणजेच 'अर्बन फार्मिंग'ची संकल्पना पुढे येणे गरजेचे आहे.

## नागरी सुविधांवर अधिक ताण

शहरीकरण वाढते, खेड्यांचा बोजा कमी होतो, शेतीवर जगणारा समाज कमी होतो. समाज उद्योग- व्यवसायाला लागतो; मग आपण या आकडेवारीचा विचार का करतो, असे वाटत असेल तर सर्वात आधी हा विचार केला पाहिजे की, ज्यावेळी जास्त प्रमाणात समाज एका ठिकाणी जमतो त्यावेळी काय काय होते! कारण हा विचार करून पुढील ५०-१०० वर्षांचे नियोजन आणि त्यानुसार कृती कार्यक्रम केला नाही तर जंगलांतील नक्षलवाद्यांपेक्षा शहरांतील नक्षलवादी जास्त घातक ठरू शकतात. शहरीकरण वाढल्यामुळे युवकांच्या रोजगाराचा प्रश्न वाढणार आहे. तसेच पाण्याची उपलब्धता, राहण्यासाठी जागेची उपलब्धता, अन्नधान्याची उपलब्धता, सांडपाण्याचे व्यवस्थापन, तसेच घनकचरा व्यवस्थापन या सर्व बाबींचा विचार शहरांच्या वाढीबरोबर करावा लागतो. शहरीकरण- औद्योगिकरण तसेच विकासाच्या विविध प्रकल्पांसाठी दरवर्षी देशातील २.२५ लाख हेक्टर शेतजमीन वापरली जाते. म्हणजेच लोकसंख्या वाढत असताना शेतजमीन कमी होत आहे. आजही जगाच्या एकूण लोकसंख्येपैकी १७ टक्के लोकसंख्या भारतामध्ये असून एवढ्या मोठ्या लोकसंख्येच्या उदरनिर्वाहासाठी जगातील एकूण जमिनीपैकी फक्त २.३ टक्के शेतीयुक्त जमीन आणि १.७ टक्के जंगल भारतामध्ये आहे. जगातील एकूण पाण्यापैकी





४ टक्के पाणी भारतामध्ये आहे. या सर्व नैसर्गिक साधनसंपत्तीचा योग्य वापर केला तरच देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण राहू शकतो. शहरीकरण होत असताना पाण्याची उपलब्धता हा फार मोठा प्रश्न असतो. मागील अनेक वर्षांत राज्यातील शेतीसाठी असलेली धरणे, त्यातील पाणी शहरातील समाजाला पिण्यासाठी तसेच उद्योगाला सुरू ठेवण्यासाठी राखीव करण्यात आले आहे. प्रत्येकाला कमीत कमी १३५ लिटर पाणी उपलब्ध करून देण्याचे मापदंड असताना शहरामध्ये आज फक्त ६९ लिटर म्हणजेच ५० टक्के पाणी उपलब्ध होत आहे. देश स्वतंत्र झाला तेव्हा प्रतिमाणशी ३४५० चौ.मी. पाण्याची उपलब्धता होती तेच प्रमाण २०२० मध्ये १८१६ चौ.मी. पर्यंत म्हणजेच ५० टक्के कमी झाले. मागील २० वर्षांत याचे प्रमाण १४८६ चौ.मी. पर्यंत झाले आणि पुढील ३० वर्षांत ते ७६० चौ.मी. पर्यंत होईल असा अनुमान आहे. जागतिक मानकाप्रमाणे प्रतिमाणशी कमीत कमी १७०० चौ.मी. पाणी उपलब्ध असेल, म्हणजेच २०५० मध्ये देशामध्ये प्रतिमाणशी पाण्याची उपलब्धता फक्त ४५ टक्के असेल. आजच शहरातील १० कोटी समाजाला शुद्ध पाणी मिळत नाही तर यापैकी मोठ्या समाजाकडे स्वच्छतागृहांची व्यवस्थित सोय नाही. म्हणजेच शहरांचा विकास होत असताना पाणी, जमीन, स्वच्छता, पर्यावरण, अन्नसुरक्षा तसेच सामाजिक सुरक्षा या सर्व बाबींचा एकत्रित विचार होणे गरजेचे आहे. या पार्श्वभूमीवर शेतीसह विविध कृषिपूरक उद्योगांची 'अर्बनायझेशन'शी म्हणजेच शहरीकरणाशी सांगड घालण्याची संकल्पना पुढे येत आहे. ■